जनसंपर्क कक्ष
5 APR 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कमवा व शिका'मध्ये मुलींचा वाढला सहभाग



## दुर्बल विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण संधी; सुरक्षिततेची भावना

राजेश मोरे : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : गुणवत्ता आहे, पण परिस्थिती नाही, म्हणून विद्यार्थ्यांनो शिक्षण थांबवू नका. शिवाजी विद्यापीठाची 'कमवा व शिका' योजना तुमच्या पाठीशी आहे. स्वावलंबनाबरोबर श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा कानमंत्र या योजनेतून दिला जातोय. सुरक्षिततेबरोबर ज्ञान मिळणाऱ्या योजनेत विद्यार्थिनींचा सहभाग वाढत आहे. शिवाजी विद्यापीठाने पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना सुरू केली. विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रेरणेतून १९६८ मध्ये याची सुरुवात झाली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गरजू आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना त्यांचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करण्याची संधी यातून दिली जाते. ग्रामीण भागातून व जिल्ह्याबाहेरील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीअभावी पुढील शिक्षण घेता येत नाही. वसतिगृह, जेवणाखाण्याचे व शैक्षणिक शुल्क कसे भरायचे,

**'कमवा व शिका' योजनेत सहभागी विद्यार्थी**

| वर्ष | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|
| २००९-१० | ७४ | ३२ |
| २०१०-११ | ६६ | ४४ |
| २०११-१२ | ७१ | ५३ |
| २०१२-१३ | ७५ | ५५ |
| २०१३-१४ | ७९ | ४४ |
| २०१४-१५ | ७६ | ५७ |
| २०१६-१७ | ६२ | ६१ |
| २०१७-१८ | ६७ | ४८ |

पान २ वर »

# 'कमवा व शिका'मध्ये मुलींचा वाढला सहभाग

» पान १ वरून

हाताला काम मिळेल का? याची हमी, नवख्या ठिकाणी सुरक्षिततेचा काय भरवसा? असे अनेक प्रश्न पालकांसह विद्यार्थ्यांना भेडसावतात. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्लब विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' ही योजना म्हणजे पर्वणीच ठरते. या योजनेतून शिक्षण घेतलेले डॉ. राजन गवस, डॉ. चंद्रकांत भोसले, प्रा. किसन कुराडे अशी अनेक दिग्गज मंडळी नावारुपाला आली.

आर्थिकदृष्ट्या दुर्लब व गरजू पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी होता येते. मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड होते.

> स्थानिक गरजू विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी होता येते. दिवसातील तीन तास काम दिले जाते. त्याबदल्यात त्यांना दिवसाला सरासरी २२ रुपये मानधन दिले जाते. ते त्यांच्या बँक खात्यावर महिन्याला वर्ग केले जाते.
> -डॉ. एस. डी. शिंदे, समन्वयक.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याचा विचार करून त्यांना दिवसातील ३ तास कार्यालयीन काम दिले जाते. झेरॉक्स काढणे, कॅशिअर, लिपिक कामात मदत करणे, संगणक हाताळणे, ग्रंथालयाचे आणि इंटरनेट विभाग सांभाळण्याचे काम विद्यार्थ्यांना दिले जाते. या श्रमाचा मोबदला म्हणून विभागातर्फे त्यांची वसतिगृह, खानावळ आणि शैक्षणिक शुल्क भरले जाते. विद्यापीठातच काम देऊन विद्यार्थिनींना सुरक्षितता दिली जाते. शिक्षणाचा खर्च घरच्यांवर टाकत नाही, स्वतःच्या पायावर उभे राहत आहोत, असा आत्मविश्वास निर्माण होतो. समन्वयक डॉ. एस. डी. शिंदे आणि डॉ. एम. एस. निंबाळकर या योजनेचे काम पाहतात.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# अक्षय देशमुखला तलवारबाजीत ब्राँझ

कोल्हापूर : अमृतसर (पंजाब) येथे पार पडलेल्या अखिल भारतीय पुरुष फेन्सिंग (तलवारबाजी) ईपी क्रीडा प्रकारामध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्रनिधीत्व करताना अक्षय देशमुख यांनी वैयक्तिक ब्राँझ पदक पटकावले. तसेच, शिवाजी विद्यापीठाच्या महिला फेन्सिंग खेळाडू अंकिता पाटील, श्रेया जाधव, ज्योती सुतार यांनी पतियाळा पंजाब येथे पार पडलेल्या अखिल भारतीय फेन्सिंग (तलवारबाजी) सेबर क्रीडा प्रकारामध्ये सांघिक ब्राँझ पदक पटकावले.

खेळाडूंना प्रशिक्षक व व्यवस्थापक डॉ.राहूल मगदूम, डॉ.धनंजय पाटील, दादासो नांगरे-पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी अभिनंदन केले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे उपस्थित होते.

5 APR 2018
लोकमत



## साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# चित्रशैलीचा अनोखा प्रयोग

तंजावर. दक्षिणेकडे विसावलेले एक संस्थानी गाव. कधीकाळीच्या या संस्थानात मराठी संस्कृतीच्या अनेक खुणा पहायला मिळतात. या परिसरातील अनेक मठात वारकरी-रामदासी कीर्तन आणि भजन आजही ऐकायला मिळतात. तसेच ऐतिहासिकतेच्या खाणाखुणा आजही तंजावरच्या जीवनशैलीत दिसतात. मराठी नाटकाची गंगोत्री भूमी म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. सरफोजी राजेभोसले यांच्या कार्यकाळात कला संस्कृतीची उच्चतम भरभराट झाली. सरस्वती महल ग्रंथालयात जगातील दुर्मीळ हस्तलिखितांचा खजिना आहे. नजीकचा समुद्र, निसर्गरमणीय प्रदेश, कावेरी नदीचे विशाल पात्र, नारळीच्या घनदाट राया आणि गोपुरांनी या प्रदेशाला मोहकता प्राप्त झाली. कलावंतांना, चित्रकारांना या प्रदेशाची भुरळ पडणं स्वाभाविक आहे.

कोल्हापुरातील दळवीज् कला महाविद्यालयाच्या आजी माजी विद्यार्थ्यांनी तंजावरचे स्थळदर्शन घडविणारे चित्रप्रदर्शन नुकतेच कोल्हापुरात आयोजित केले होते. प्रत्यक्ष तंजावरला जाऊन या प्रदेशाचे रेखांकन त्यांनी चित्रांतून केले आहे. वास्तूदर्शन घडविणारी ही दृश्यचित्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. बृहदेश्वर, मीनाक्षी मंदिर तसेच शिवसौद मराठी दरबार हॉल व इतरही काही स्थळांची ही रचनाचित्रे आहेत. वास्तूअवकाशाचे विविध 'कोणा'तून दर्शन घडविले आहे. उंच गोपुरे, खांब, शिल्पचित्रे, अक्षररेखांकन, लिपीचिन्हे, नृत्यमुद्रा आणि लयबद्ध नक्षीकामांनी ही चित्रे सजली आहेत. शिल्पांतील कथामुद्रा, नागाकृती, सिंहाकृतींचे भावदर्शन घडविले आहे. भारतीय शिल्पकलेत नंदीने वेगळे स्थान मिळवलेले आहे. त्या नंदीचे या चित्रकारांना कमालीचे आकर्षण आहे. मंदिर प्रवेशारंभीचे भव्य नंदी त्यांच्या स्थिती अवयवाकारांचे या चित्रकारांनी फार बारकाईने चित्रणे केली आहेत. विविध आकारातील पुष्ट नंदी, त्यांच्या स्थिर, शांत नक्षीदार अवयवाकारांनी चित्रांना वेगळी रंगत प्राप्त झाली आहे. काही चित्रांत केवळ दूरवरच्या देवळातील सपाट भुईच्या पार्श्वभूमीवर खांबांची भव्यता दर्शविली आहे. महादेव, शिवपिंड अर्धनारीनटेश्वर ही प्रतीक रंगचित्रे अनोख्या आदिम भावप्रदेशात घेऊन जातात. या चित्रांतल्या वैशिष्ट्यपूर्ण रंगभरणीने गूढ, आदिम शिवालयाच्या वातावरणाचा भासप्रत्यय दिला आहे. गडद शेवाळी हिरवा, फिकट खरबुजी भगवा, जांभळ पांढरा, त्यात निळ्याची मिसळण यातून शिवोपासनेच्या आदिम काळसंवेदनांचा प्रत्यय येतो. नंदी व हत्तीच्या लयबद्ध मनमोहक अवयावाकारातून विविध पुराणकथांचे ध्वनी मनात तरळतात.ही रचनाचित्रे जलरंगातील आहेत. या चित्रातील रंगांचा वेगळेपण म्हणजे वेगवेगळ्या रंगवापरातून त्यांच्या कोवळिकतेचा व ताजेपणाचा प्रत्यय दिला आहे. भूतकाळ, आदिमता आणि वर्तमानाच्या ऊर्जादायी प्रकाशरंगांच्या खेळाची उधळण या चित्रांत आहे. भव्यतादर्शन हा या चित्रशैलीचा वेगळेपणा आहे. आकाशात उंचच्या उंच घुसणारी गोपुरे, उंच खांबावरील अर्धनारीनटेश्वराची प्रशांत ध्यानस्थ प्रसन्न शिल्पाकृती,भुईवर छोट्या आकारातील माणसे हात जोडून शरण्यभावाने उभे आहेत. सबंध कॅन्व्हॉसवरील खरबुजी रंगमाखणीतून विरक्तीचा, वैराग्यभावाचा घनदाट गडद प्रत्यय घडतो. वास्तूंच्या भव्यतेतून अधिभौतिक शक्तीची विशालता आणि मानवी मनातील लीनतेचा प्रत्यय या अवकाश रंगभरणीतून घडविला आहे. कोणतीतरी अद्भूत सत्ता आणि मानवी मनातील अल्लंघ्य अंतरायाची जाण या रंगावकाशातून प्रत्ययाला येते. नागमुद्रा,नंदींचे आकार, शिवपिंडी, पक्षी, प्राणिकृती, कपाळावरील लालपांढ्या भस्माकाराचे पट्टे, स्वस्तिक, रांगोळीतल्या करड्या शेवाळी रंगाच्या पार्श्वभूमीवर पांढ्या ठिबक्यानेआणलेली नजाकत या चित्रांत आहे. आधुनिक काळदर्शन घडविणारी काही चित्रे आहेत.



तीनचाकी साहित्य वाहून नेणारा सायकलस्वार मजूर गिऱ्हाइकाच्या प्रतीक्षेत निमूटपणे पाठमोरा हात उशाशी घेऊन पहुडलेला आहे. या व्यक्तिचित्रणे व स्थळचित्रांतून तंजावर प्रदेशाची विशिष्ठता आणि रंगभाव प्रकटला आहे. एका वेगळ्या प्रदेशातील ही भूचित्रे एका संस्कृतीची काहीएक परंपरा ओळख दर्शवितात. शिवभक्तीची आदिमता आणि गोपुरांच्या वास्तूंच्या घनदाटतेचा प्रत्यय देणारी ही चित्रे आवर्जून पहावी अशी आहेत. एका ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा विरासतीलाकोल्हापूरच्या चित्रपरंपरेने दिलेली ही मानवंदनाच होय.